ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

ISSN 2229-4406

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# UNIVERSAL
## RESEARCH ANALYSIS

URA

UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

EDITOR IN CHIEF
Dr. BALAJI KAMBLE

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

IMPACT FACTOR 4.22

mm Patel ISSN 2229-4406

UGC Approved International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects

URA

# UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

## UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue - XV, Vol. XII
Year - VIII (Half Yearly)
Sept. 2017 To Feb. 2018

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact : 02382 -241913**
9423346913 / 9503814000
9637935252 / 7276301000

**Website**
**www.irasg.com**

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Publisher :**
Jyotichandra Publication
Latur, Dist. Latur - 413531. (MS)

Price : ₹ 200/-

**CHIEF EDITOR**

Dr. Balaji G. Kamble
Research Guide & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur. (M.S.)India.

**EXECUTIVE EDITORS**

Dr. Suhas Avhad
Chairman, BOS in Economics,
S. P. Pune University
Pune, Dist. Pune (M.S.)

Dr. D. Raja Reddy
Chairman, International Neuro Surgery Association,
Banjara Hill, Hayderabad (A.P.)

Dr. E. Siva Nagi Reddy
Director, National Institue of Hospitality & Tourism Management,
Hyderabad (A.P.)

Dr. A. H. Jamadar
Chairman, BOS Hindi,SRTMUN & Head, Dept. of Hindi, BKD College,Chakur, Dist. Latur (M.S.)

Dr. Yu Takamine
Professor, Fafulty of Law & Letters,
University of Ryukyas,
Okinawa, (Japan).

Dr. Shaikh Moinoddin G.
Dept. of Commerce,
Lal Bahadur Shastri College,
Dharmabad, Dist. Nanded(M. S.)

Dr. Sadanand H. Gone
Principal, Ujwal Gramin Mahavidyalaya, Ghonsi,
Dist. Latur. (M.S.)

Scott A. Venezia
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

**DEPUTY-EDITOR**

Dr. N. G. Mali
Head, Dept. of Geography,
M. B. College,
Latur,Dist. Latur.(M.S.)

Dr. Babasaheb M. Gore
Principal,
Smt. S.D.D.M.College
Latur, Dist. Latur (M.S.)

**CO-EDITORS**

Dr. V.J. Vilegave
Head, Dept. of P.A.,
Shri. Guru Buddhiswami College,
Purna, Dist. Parbhani (M.S.)

Dr. Omshiva V. Ligade
Head, Dept. of History
Shivjagruti College, Nalegaon,
Dist. Latur. (M.S.)

Dr. S.B. Wadekar
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

Dr. Shivanand M. Giri
Dept. of Marathi,
Bhai Kishanrao Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded EDUCATION SOCIETY'S

Issue : XV, Vol. XII
UNIVERSAL RESEARCH ANALYSIS URA
IMPACT FACTOR 4.22
ISSN2229-4406
Sept. 2017 To Feb. 2018

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Gender Discrimination in Health<br>**Dr. M. M. Patel** | 1 |
| 2 | A Study of Symbolism in Girish Karnad's Play Tughlaq<br>**Anant J. Somuse** | 7 |
| 3 | Gender and Race in the Select Plays of George Bernard Shaw<br>**Dr. Shyam T. Jadhav** | 11 |
| 4 | Principles of India's Foreign Policy & Impact on World Politics<br>**Dattatray M. Waghule** | 16 |
| 5 | Characteristics of Population in Nanded District<br>**Renuka G. Tammalwar** | 22 |
| 6 | भारताचे कृषी उत्पादन २०२२ पर्यंत दुप्पट करण्याचा कृती कार्यक्रम : विशेष संदर्भ मराठवाडयाचा चिकित्सक अभ्यास<br>**डॉ एल. एच. पाटील** | 27 |
| 7 | १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणाचा आढावा<br>**पांडूरंग हरिश्चंद्र बावचकर** | 32 |
| 8 | अनुवाद : महत्व आणि योगदान<br>**डॉ सुरेश व्ही. शिंदे** | 37 |
| 9 | बसवेश्वरकालीन धार्मीक व्यवस्था<br>**डॉ. रत्नाकर बाबूराव लक्षटे** | 53 |
| 10 | दलिता समोरील आव्हाने आणि उपाय<br>**डॉ. पी. एस. देशमूख** | 59 |

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
EDUCATION SOCIETY'S
Dist.Nanded



9

# बसवेश्वरकालीन धार्मीक व्यवस्था

*रत्नाकर बाबूराव लक्षटे*
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
देगलूर महाविद्यालय,
देगलूर, जि. नांदेड (महाराष्ट्र) भारत

**Research Paper - Political Science**

बसवेश्वरकालीन सामाजिक व्यवस्था पाहताना संशोधकावर काल खंडाच्या संदर्भातील मर्यादा येतात. पण संशोधकांने त्यास उपलब्ध झालेल्या दुय्यम साधनसामुग्रीच्या आधारे बसवेश्वरकालीन सामाजिक व्यवस्थेचा आढावा घेतला आहे. बसवेश्वरकालीन सामाजिक व्यवस्था पाहतानां संशोधकाने कांही बाबींना प्रमाण मानले. यात बसवेश्वराच्या जीवनचरित्रात घडलेल्या कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक घटना, बसवेश्वर व समकालीन शरणांच्या वचनातुन व्यक्त होणारे समाजजिवन. यातही प्रामुख्याने वचन हे सामाजिक व्यवस्था व्यक्त होण्यासाठीचे प्रमुख माध्यम संशोधकास वाटते. बसवेश्वर व शरणांनी कन्नड भाषेतुन वचने लिहिली होती. आज या वचनांचा इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेत अनुवाद बऱ्याच प्रमाणात उपलब्ध आहे. अशी अनुवादीत उपलब्ध वचने आणि बसवेश्वरांचा समाजसुधारक या अनुषंगाने ज्या अभ्यासकांनी अभ्यास केला, त्यांच्याशी संवाद साधुन संशोधकाने बसवश्वरकालीन सामाजिक व्यवस्था स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. बसवेश्वराचा कालखंड 12 व्या शतकातला आहे. 21 व्या शतकातील वैश्वीक, भौतीकवादी, व्यापारवादी, ज्ञानाधिष्ठित आणि विवेकवादी समाजव्यवस्थेच्या युगात 12 व्या शतकातील बंदिस्त, बहुजनाच्या गुलामगिरीची व्यवस्था मांडण्याचा प्रयत्न केला. संशोधकाच्या मते बसवेश्वरकालीन सामाजिक व्यवस्था खालील उपघटकाच्या साह्याने तपासता येईल.

बसवेश्वराच्या कालखंडात वैदीक धर्मप्रणित व्यवस्था होती. तसेच जैन, बौध्द हे धर्मही प्रचलित होते. जैन धर्म-श्वेतांबर, दिगंबर, बौध्द धर्म-हीनयान, महायान, मंत्रयान, सहजयान, वज्रयान, वैष्णवात-रामोपासक व

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
EDUCATION SOCIETY'S
Dist. Nanded

कृष्णोपासक आणि शैवात-पाशूपत, काळामुख, कापलिक, लाकुलिश, अघोर इ. शाखा व संप्रदाय होते. जैन व बौध्द धर्मापेक्षा वैदिक धर्माचे प्रस्थ अधिक होते. समाजावार वेद, पुराण, मनुस्मृती प्रणीत रुढी, परंपरा, श्रध्दा, व्यवस्था, सिध्दांत इ. चा अधिक पगडा होता. वेदांना प्रमाण मानुन जीवन जगत असत. तत्कालीन चालुक्य राजांनी वैदीक धर्माला प्रोत्साहन दिले होते. बसवेश्वरकालीन धार्मिक व्यवस्था बहुदेवोपासना पध्दती, मंदिर संस्कृतीचे प्रस्थ, पुरोहितशाहीचे वर्चस्व, तत्कालीन धर्माचे स्वरुप, समाजातील अंधश्रध्दाचे वाढते प्रस्थ इ. च्या अनुषंगाने तपासता येते.

बसवकालीन धर्माला वेद, पुराण व मनुस्मृतीचा स्पर्श होता. धर्माला शोषणाचे, गुलामगिरीचे स्वरुप प्राप्त झाले होते. धर्माच्या नावावर माणसे माणसांना पशुप्रमाणे वागवत असत. धर्म हि विशिष्टांची मक्तेदारी बनले होते. धर्माला नकारात्मक स्वरुप प्राप्त झाले होते. धार्मिक अधिकाराचे केंद्रीकरण झाले होते. हिंसा धर्माचे प्रमाणभुत तत्व होते. धर्माच्या नावावर ऐतखाऊ प्रवृत्तीने जिवन जगणाऱ्या बांडगुळाची जात समाजात फोफावली होती. समाजात दुफळी निर्माण करण्याचे काम धर्माच्या साह्याने केले जात असत. सामाजिक व आर्थिक हक्कांना आपल्या मुठीत ठेवण्याचे धर्म हे महत्वाचे साधन होते. धर्म मानवी मनाला दुभंगवण्याचे हत्यार होते. बसवेश्वरकालात धर्माच्या नावावर बहुजनांचे शोषण करण्यासाठी अनेक देव-देवतांची निर्मिती करण्यात आली. अज्ञानी बहुजन समाजाने अनेक देव देवतांच्या अस्तित्वाला मान्यता दिली. महाभारतातील गांधारीप्रमाणे डोळे असुनही डोळयावर बहुदेवतेची पट्टी बांधुन बहुजन समाज जीवन जगत होता. तत्कालीन समाजात कोण-कोणते देव होते हे बसवेश्वरांनी आपल्या खालील वचनातुन स्पष्ट केले.

" मडके देव, सुप देव
अन् रस्त्याबाजूचा, दगडही देव
हा देव अन तो देव म्हणत म्हणत पाऊल ठेवण्यासाठीही नाही ठेवली जागा"

यावरुन आपण असे म्हणु की, तत्कालीन समाजात मडके , सुप आणि दगडालाही देव मानत असत. माणसासारख्या सजीवाला व्यवस्थेने देवत्व दिले नाही पण निर्जीव, अबोल, मातीच्या, खापराच्या व दगडासमान वस्तुला देवत्व दिले. पुढच्या एका वचनात बसवेश्वरांनी तत्कालीन ग्रामदेवतामुळेही समाजात बहुदेवोपासनेची प्रथा रुढ झाल्याचे म्हटले.

"दुर्गम्मा , पोच्चम्मा करुन त्या मुर्ती
गळयात बांधती ताईत ते
कर्ज होता मुर्ती टाकीती विकून
ठेवुनि गहाण भरती पोट
विकला जाणारा नव्हे माझा देव

Degloor College, Degloor ... Education Society ... Dist. Nanded



कुडलसंगम सम अन्य काही. "

या वचनातून देवाला विकून पोट भरणाऱ्या मानवी स्वार्थी प्रवृत्तीचे दर्शन घडवले. देवाच्या ...वावर जगणारी माणस, गरज पडल्यास त्यासच विकणाऱ्या प्रवृत्तीचे हो़ी. आजही अशी व्यवस्था तिरुपती, ...ढरपूर, तुळजापूर इ. प्रमुख देवस्थानातुन दिसुन येते. धर्माचा आधारे घेवुन अनेक देव निर्माण करायचे या ...गाचा उद्देश समाजाचे आर्थिक शोषण करुन आपली खळगी भरणे. अशी रोगट धर्मव्यवस्था त्या काळात होती. तसेच बसवेश्वरकाळातील समाज अंधश्रध्देने गाडिंग, डिंबुग, मारय्य, बीरय्य , केचर, गाविल, अंतर, बेंतर, ...ळय्य, दुळय्य, माळय्य, केतय्य इ. भुत-प्रेतांची पुजा व उपासना करत असत.

बसवेश्वरकाळातील धर्मव्यवस्था स्पष्ट होण्यासाठी अंधश्रध्देच्या कल्पनेवर प्रकाश टाकणे अगत्याचे ...रते. समाजातील स्वयंघोषित अभिजनांनी स्वहितासाठी समाजात अनेक प्रकारच्या अंधश्रध्दांचे स्तोम माजवले होते. धर्म व धर्मग्रंथ शब्दप्रामाण्यता, गुरु व गुरुशब्दप्रामाण्यता इ. वर डोळे झाकुन विश्वास ठेवणारी बहुजनांची एक पिढीच निर्माण केली होती. बहुसमाजही समाजातील अभिजन सांगतील त्याप्रमाणे ।गणारा होता, यामागे कांही ...रणेही होती, बहुजांना शिक्षणाचा हक्क नव्हता. धर्मग्रंथाची चिकित्साच करायची नाही अशी एक व्यवस्थाच अभिजनवादयांनी निर्माण केली होती.

दगडांना , मडक्यांना देव मानुन त्यांची पुजा करणे, पापातुन मुक्ति मिळावी म्हणुन तिर्थाटन व गंगास्नान ...रणे, जन्मोजन्मी हाच नवरा मिळावा म्हणुन स्त्रिया वडाची पुजा करत असत, ज्याचा उल्लेख बसवेश्वरांच्या खालील वचनातुन येतो.

"वड, पिंपळा गुंफूनिया दोरा, परिक्रमा करिशी
परि न तू, कर्ममुक्त होशी
मंत्रतंत्र दंभाचाराशी व्यर्थ बळी पडशी
कुडलसंगम मान्य न होशी. "

बसवेश्वरकालीन धर्म व देव हिंसक होता. देवाची आराधना करण्यासाठी पशुचा बळी देणारी हिंसक प्रथा समाजात प्रचलित होती. पशुबळी दिल्याने उपासने मागणचे इप्सित साध्य होते, ही अंधश्रध्दा होती. बळी ...ण्यास आणलेल्या बकऱ्याप्रमाणेच अज्ञानी असणारा मनुष्य अज्ञानी प्रथांचे पालन करण्यातच धन्यता मानणारा होता. स्वतःस ज्ञानी म्हणवणारे अल्पसंख्य लोक बहुसंख्यांकडून अज्ञानी, हिंसक, अमानवीय, अनैतीक कृत्य ...रवत असत.

" नवसाचा बकरा, सणासि आणला
तोरण पाणाला खाऊ लागे
बळी जावयाचे, नाही तया भान

EDUCATION SOCIETY'S COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded



पोटाकडे ध्यान, बापुडयाचे
जन्म होई जसा, मरतसे तैसा
अज्ञानी तो ऐसा, बळी जाय
कुडलसंगमदेवा वधिती जे त्यासी
मरण तयासी चुकेल का ? "

बसवेवर मानवाच्या धार्मिक वर्तनातील विरोधाभास खालील वचनातुन स्पष्ट करतात.

" दगडी नागाला दुध पाजिती ती
जित्या पाहती मारती त्या
भुकेला जंगम (माणुस) आल्यास घरा, चला येथुनी म्हणती
न खाणाऱ्या दगडा देवास धरा नैवेध म्हणती
कुडल संगाच्या शरणांना बधुनी झाल्यास उदास
दगडाने ठचल्यापरि होई ढेकळास "

या वचनात बसवेश्वरांनी मानवाचे धार्मिक आचार मानवतेविरुध्द असुन निर्जिव वस्तुचे संगोपन करणारे आहेत याचे चित्रण केले आहे. धर्माच्या नावाने कर्मकांडाला उत आलेला होता. सदसदविवेक बुध्दीचा विसर माणसांना झाला होता. तत्काळातील समाजात धर्माच्या साह्याने मानवाला नाचवणारी व्यवस्था होती. बालके, तरुण, वृध्द, स्त्रिया, पुरुषही धर्माच्या नावावर जीवन जगत असत. पतीच्या निधनानंतर सती जाणे धर्म मानला जात होता. भुत-पिशाच्च, व्रत-वैकल्य इ. कल्पनां समाजात महत्वाच्या ठरल्या होत्या. समाजात शकुन-अपशकुनाचे प्रस्थ वाढले होते.

" गारुडी नकटया पत्नीला घेऊन, सापाला हाती घेऊन
मुलाच्या लग्नाला मुहुर्त पाहण्यास निघाला.
समोर दुसऱ्या गारुडयाला नकट्या पत्नीसह पाहुन
अपशकुन झाला म्हणतो. अशा बुध्दिवंताला पहा.
आपली पत्नी नकटी. आपल्या हाती साप
आपणही नकटा
आपले दोष न जाणता दुसऱ्याचे दोष शोधणाऱ्या
कुत्र्यांना काय म्हणू कुडसंगमदेवा " 9

म्हणजेच तत्काळात लग्न विधीसाठी शुभमुहर्त पाहण्यास प्राधान्य देणारी व्यवस्था होती. समाजात शकुन अपशकून मानणारे लोक होते. धर्माची परिस्थिती विचित्र असल्यामुळे समाज जीवन अस्ताव्यस्त झाले

IMPACT FACTOR 4.22 ISSN 2229-4406 Sept. 2017 To Feb. 2018


...धर्माचे दया,मानवतावादी स्वरुप जावून धर्ममार्तंडाची हुकूमशाही प्रस्थापीत झाली होती. पुरोहीतशहानी धर्माला ...ची व्यक्तीगत मालकी बनवले होते. स्वतःच्याहीतासाठी मंदिर अनुष्ठाने,व्रतवैकल्ये,नवस,उपासतपास,उद्यापने,जप- ...,विविधव्रते,तिर्थयात्रा मावंदे,प्रायश्चित,विधी,श्रोतकर्म, इ. कर्मकांडाची पुराणांच्या साहयाने निर्मिती केली, या ...कांडामुळे सर्वसामान्य गोरगरिबांचे शतकानुशतके शोषणच होत राहिले.

वैदीकांनी होमहवन यज्ञयागाची पध्दत प्रचलित केली. मोक्ष व पुण्य प्राप्तीच्या लोभाने समाजात बोट ...हि,नाक दाबून पुजा करणे, एका पायावर उभे रहाणे, काटयांवर झोपणे, निखाऱ्यावरुन चालणे, पाण्याचा घोट ...न घेता उपवास करणे, हठयोग साधना करणे. इ. केवळ दिखावू व क्लेषदायक भक्तिसाधनेला प्रतिष्ठा ...ती.ज्याचे वर्णन बसवेश्वर खालील वचनात करतात.

बोटे मोजून परमार्थ शक्य होणे
आश्चर्यकारक नव्हे का ?
नाक दाबून मुक्तिची अपेक्षा करणे
हास्यास्पद नव्हे का ?

धर्मशास्त्र हे ब्राहमणांनीच तयार केलेले असल्यामुळे जोशी, भट, उपाध्ये, धर्माधिकारी,बडवे,पुरोहित ...नी सांगितलेल्या व्रताचरणाला विशेष महत्व होते. धमाच्या नावावर मंदिरांची निर्मिती करण्यात आली. मंदिरातून ...कुजनांच्या शोषणाचे सत्र अहोरात्र राबवण्यात येत असत. मंदिरातील भट,भिक्षुक किंवा पुजाऱ्यांची शारिरीक ...गरज भागविण्यासाठी देवाच्या नावावर देवदासी प्रथेची निर्मिती करण्यात आली. तत्कालीन समाज स्वर्ग-नरक अशा कल्पनांत गुरफटलेला होता. तत्कालीन लोकांचा कर्मवादापेक्षा दैववादावर अधिक भर होता. ठेविले अनंते तैसेचि रहावे, दे रे हरि पलंगावरी या म्हणीप्रमाणे लोक जीवन जगत असत अशा अंधश्रध्देच्या विचाराने समाज विवेकहीन बनला होता. तत्कालीन समाजातील भुतबाधेविषयीचे समाजवास्तव बसवेश्वर आपल्या वचनात मांडतात यदि भूतग्रस्त व्यक्ति केवस्त्र स्वस्थ व्यक्ति पहने तो भूतग्रस्त व्यक्ति स्वस्थ तथा स्वस्थ व्यक्ति भूतग्रस्त हो जाता है. चारो और चर्चा चल पडती है !

यावरुन माणसाच्या बुध्दिवरील धर्माचा पगडा,अविवेकीपणा,आरोग्याविषयीचे अज्ञान आणि सामान्य ज्ञानाविषियीचे स्पष्टीकरण होते. आयुरेखा के बिना धनरेखा से क्या लाभ ? बसवेश्वरांच्या या वचनावरुन तत्काळात ज्योतिष विदयेचे प्रस्थ असल्याचे दिसून येते. भूत पिशाच्चप्रमाणे कानुले, भाजी,दहीभात मागणाऱ्यांनो आपले उदरभरण न करणारे, लोकांना त्रास देवून मृताचा आहार कावळा होऊन खाणाऱ्यांनो मागुन-मागुन आपले जीवन निरर्थक करु नको.

वसवेश्वरांचे वरील वचन तत्कालीन ऐतखाऊ वृत्ती, भिकारी प्रवृत्ती, आणि स्वार्थी व्रतीचे वर्णन करणारी आहे. बसवकाळात इश्वर दर्शनासाठी शारिरीक यातना सहन करत परदेशास जाणारा वर्ग होता. ज्याचे

ADARSH EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

ADARSH VIDYAPEETH EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded



वर्णन अंबिगर चौडय्या यांने आपल्या वचनात केले. ईश्वर दर्शन की ईच्छा हो तो
विदेश यात्रा का कष्ट न उठाओ काशी जाकर शरीर नाश न करे

या शिवाय सर्व पाप धूवून जावेत म्हणून गंगा स्नान करणे,भविष्याची सुरक्षितता व धनलोभापोटी धन जमिनीत गाढून ठेवण्याची प्रथा बसव काळात होती. तसेच मंदिर संस्कृती , देव व मानवात मध्यस्थाची भुमिका बजावणारा पुराहित होता. पुजेसाठी गाडिभरुन बेल व फूल आणले जात असत. ब्राम्हणांना देवाचा दर्जा होता.

## संदर्भ सूची :-


1) डॉ. अशोक कामत (1999) : महात्मा बसवेश्वर - काळ, व्यक्ती, वचन साहित्य आणि शरणकार्य - सत्संग प्रतिष्ठाण, पुणे -
2) माते महादेवी (अनुवादक - शालीनीताई दोडमनी) (प्रथमावृत्ती 1997) - कल्याणक्रांती - बसवधर्माचे महाजगद्‌गुरु पीठ कुडलसंगम ता.हुनगुंद जि.विजापूर.
3) R. C. Hiremath (1967) : Sri Basvesvara ! A Biography - Published in Sri Basveswara - A communication Volume - Bangalore Page No. 12 and 30.
4) डॉ. भगवानदास तिवारी (प्रथमावृत्ती - 2001) : विश्वमानव बसवेश्वर- बसव शांती मिशन प्रकाशन, धारवाड -
5) Dr. P.B. Desai (IInd Edition - 2006) : Basveshwara And His Times - Basava Samiti, Basava Bhavan, Bangalore -
6) अनुवादक ॲड. जे.के. पाटील (प्रथमावृत्ती 1996) महामानव बसवेश्वर ऐतिहासिक चरित्र व वीरशैव धर्म - कन्नड संशोधन संस्था कर्नाटक विद्यापीठ धारवाड - 1996
7) प्रा.शालीनीताई दोडमनी (प्रथमावृत्ती 2001) : महामानव बसवण्णांची समग्र वचने -


Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded